



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : ८४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.०६ नोव्हेंबर २०२४


## ‘लाडक्या बहिणींना’ १५०० ऐवजी २१०० रुपये करणार

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०५, कोल्हापूर :**
महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सध्या महायुती आणि महाविकास आघाडीसह सर्वच पक्षाच्या नेत्यांकडून जोरदार प्रचार सुरु आहे.

महाराष्ट्रातील विविध मतदारसंघात सभा आणि मेळावे सुरु आहेत. या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. यातच आज महायुतीची एकत्रित जाहीर सभा कोल्हापूरमध्ये पार पडली. या सभेत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. तसेच यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी १० मोठी आश्वासने दिली आहेत. यामध्ये लाडक्या बहिणींना १ हजार ५०० रुपयांवरून २ हजार १०० रुपये, शेतकऱ्यांची कर्जमाफी, २५ हजार महिलांची पोलीस भरती अशी १० मोठी आश्वासने दिली आहेत.

**एकनाथ शिंदे काय म्हणाले?**

२०१४ साली झालेल्या निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात याच ठिकाणावरून आम्ही केली होती. आता देखील या ठिकाणाहून प्रचाराची सुरुवात आम्ही करत आहोत. आता २३ तारखेला आम्ही विजयाचा गुलाल घेतल्यानंतर पुन्हा या ठिकाणी आल्याशिवाय राहणार नाहीत. आमच्या महायुतीचा जो जाहीरनामा आहे, त्या जाहीरनाम्यातील १० प्रमुख आश्वासने आज ठिकाणी मी तुमच्यासमोर सांगत आहे. आम्ही जे बोलतो ते करतो. त्यामुळे आता आम्ही लाडक्या बहिणींना १ हजार ५०० रुपयांवरून २ हजार १०० रुपये करणार असल्याचं आश्वासन आम्ही देत आहोत,




असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

**मुख्यमंत्री शिंदेंनी कोणते १० आश्वासन दिले?**

- लाडक्या बहिणींना १ हजार ५०० रुपयांवरून २हजार १०० रुपये देण्याचं आश्वासन.
- २५ हजार महिलांची पोलीस दलात भरती करण्याचं आश्वासन.
- शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतकरी सन्मान योजनेसह राज्य आणि केंद्राचे मिळून आता १५ हजार करणार.
- तसेच एमएसपीवर २० टक्के अनुदान देण्याचं आश्वासन आम्ही देत आहोत.
- वृद्ध पेन्शन योजनेमध्ये आता १ हजार ५०० रुपयांवरून २ हजार १०० रुपये करण्यात येणार आहेत.
- २५ लाख रोजगार निर्मिती करण्याचं काम आम्ही करणार आहोत, तसेच १० लाख विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याचं आश्वासन.
- २५ हजार गावात रस्ते बाधण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत. शहराच्या विकासाबरोबरच गावाचाही विकास करण्याचं आश्वासन
- अंगणवाडी आणि आशा सेविकांना १५ हजार आणि विमा सुरक्षा देण्याचं आश्वासन.
- विजबिलामध्ये ३० टक्के कपात करण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत.
- महायुतीचं सरकार आल्यानंतर ‘व्हिजन २०२९’ हे १०० दिवसांच्या आत सादर करण्याचं आश्वासन.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची आज एकत्र कोल्हापूरमध्ये जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना त्यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर जोरदार टीका केली. तसेच महायुतीच्या जाहीरनाम्यातील १० प्रमुख आश्वासने मुख्यमंत्री शिंदे यांनी वाचून दाखवली. तसेच हे फक्त ट्रेलर असून सविस्तर जाहीरनामा लवकरच प्रसिद्ध होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी सांगितली.

## अजित पवारांवर विश्वास ठेवत सुजित पाटलांची माघार

## पवारांच्या शब्दाला सुजित पाटील जागले



**अक्षराज : राजकुमार इकडे**
**दि.५ सुपा (अहिल्यानगर) :** विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. पारनेर नगर विधानसभा मतदार संघात अनेक अपक्षांनी अर्ज माघारी घेतले. निवडणुकीत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व पवार कुटुंबाचे खंदे समर्थक सुजित झावरे पाटील यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. परंतु अजित पवार यांच्या सोबत असलेले घनिष्ठ सबंध व अजित पवार यांनी सुजित पाटलांसोबत दूरध्वनी वरून संपर्क साधल्यामुळे अजित पवार यांच्यावर विश्वास ठेवून सुजित झावरे पाटील यांनी विधानसभा निवडणूकीतून माघार घेतली. या निवडणुकीत महाविकास आघाडी कडून राणीताई लंके तर महायुतीकडून ज्येष्ठ नेते काशिनाथ दाते सर उमेदवारी करत आहेत. माजी आमदार विजय औटी, माजी नगराध्यक्ष विजू औटी तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य शिवसेना नेते संदेश कार्ले हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

पारनेर तालुक्याच्या राजकारणात स्व. माजी आमदार वसंतराव झावरे पाटील व सुजित झावरे पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये स्थापनेपासून सोबत होते. परंतु तालुक्याच्या राजकारणात मध्यंतरी स्थित्यंतरे झाल्याने सुजित झावरे यांनी अलिप्त पणाची भूमिका घेतली होती. पवार कुटुंबाच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली राष्ट्रवादी पक्षामध्ये तालुक्यात काम करत असताना अनेक विकासाची कामे मार्गी लावली.

सद्य परिस्थितीत तालुक्याच्या राजकारणात सुजित झावरे पाटील यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. हे अजित पवार यांना माहित असल्या मुळे सुजित झावरे यांना संपर्क करून अजित पवार यांनी त्यांच्यासोबत तालुक्याच्या राजकीय परिस्थितीवर चर्चा केली व सुजित झावरे पाटील यांनी अपक्ष उमेदवारी भरली असल्याने ती माघार घेण्यासाठी त्यांना सांगितले अजित पवार यांचा शब्द सुजित पाटलांनी प्रमाण मानून व त्यांच्या नेतृत्वावर असलेला विश्वास पूर्ण करण्यासाठी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली सुजित पाटील यांनी उमेदवारी केली असती तर तालुक्याच्या राजकारणात सध्या चित्र वेगळे असते परंतु पवार कुटुंब व अजित पवार यांच्या विश्वासाला सुजित झावरे पाटील हे जागले आहेत. अजित पवार सुजित झावरे पाटील यांना पुढील राजकारणात योग्य तो न्याय देतील ही अपेक्षा. या विधानसभा निवडणुकीमध्ये पारनेर तालुक्याच्या राजकारणात सध्या सुजित झावरे पाटील काय भूमिका घेतात राजकीय संदर्भीय अभ्यास केला तर सुजित झावरे पाटील हे सध्या तालुक्याच्या राजकारणात किंगमेकर च्या भूमिकेत दिसून येतात त्यामुळे ते कोणत्या उमेदवारा सोबत भूमिका घेऊन जाहीर करतात हे समजेल.

## राज्यात ९.७ कोटी मतदार ; पुण्यात सर्वाधिक...

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०५, मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी २८८ मतदारसंघातील सुमारे ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारसंख्येत पुणे जिल्हा आघाडीवर आहे. रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत अधिक आहे.

**पुण्यात ८८ लाखांहून अधिक मतदार**

पुण्यातील एकूण मतदारसंख्या ८८ लाख ४९ हजार ५९० आहे तर मुंबई उपनगरात ७६ लाख ८६ हजार ९८ मतदार आहेत. ठाण्यात ७२ लाख २९ हजार ३३९, नाशिक जिल्ह्यात ५० लाख ६१ हजार १८५ आणि नागपुरात ४५ लाख २५ हजार ९९७ मतदार आहेत.

**५ जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या अधिक**

रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. रत्नागिरीतील एकूण मतदार संख्या १३ लाख ३९ हजार ६९७ असून यामध्ये ११ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ४६ हजार १७६



आणि महिला मतदार ६ लाख ९३ हजार ५१० आहेत. नंदुरबारमध्ये एकूण मतदार १३ लाख २१ हजार ६४२ असून यामध्ये १३ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ५४ हजार ४१२ आणि महिला मतदार ६ लाख ६७ हजार २१७ आहेत.

गोंदिया जिल्ह्यात एकूण मतदार ११ लाख २५ हजार १०० असून यामध्ये १० तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ५ लाख ५३ हजार ६८५ आणि महिला मतदार ५ लाख ७१ हजार ४०५ आहेत. भंडारा येथे एकूण मतदार १० लाख १६ हजार ८७० असून यामध्ये ४ तृतीयपंथींची नोंद आहे; पुरुष मतदार ५ लाख ६ हजार ९७४ आणि महिला मतदार ५ लाख ९ हजार ८९२ आहेत. सिंधुदुर्गात एकूण मतदार ६ लाख ७८ हजार ९२८ असून यामध्ये ३ तृतीयपंथींची नोंद आहे. पुरुष मतदार ३ लाख ३६ हजार ९९१ आणि महिला मतदार ३ लाख ४१ हजार ९३४ आहेत.

**राज्यात ४.६९ कोटी महिला मतदार**

राज्यात विधानसभेसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांची नोंद आहे ज्यामध्ये ५ कोटी २२ हजार ७३९ पुरुष, ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला आणि ६ हजार १०१ तृतीयपंथी मतदार आहेत.

**५ जिल्ह्यात ३० लाखांहून अधिक मतदार**

अहमदनगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि औरंगाबाद या पाच जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक मतदार आहेत. सोलापूरमध्ये ३८ लाख ४८ हजार ८६९, अहमदनगरमध्ये ३७ लाख ८३ हजार ९८७, जळगावमध्ये ३६ लाख ७८ हजार ११२, कोल्हापूरमध्ये ३३ लाख ५ हजार ९८ आणि औरंगाबादमध्ये ३२ लाख २ हजार ७५१ मतदार आहेत.

बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या १० जिल्ह्यांमध्ये २० लाखांहून अधिक मतदार आहेत.

## ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मधून २४४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.०५, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना अर्ज मागे घेण्याचा ४ नोव्हेंबर २०२४ हा अंतिम दिवस होता. ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात एकूण ३८१ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी एकूण ३३४ उमेदवारांचे अर्ज वैध तर ४७ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले होते.

वैध ठरलेल्या ३३४ उमेदवारांपैकी आज (दि.४) एकूण ९० उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले, त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील एकूण १८ विधानसभा मतदारसंघात एकूण २४४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

## धक्कादायक! रेल्वे पुलाखाली अल्पवयीन मुलीवर करायचा लैंगिक अत्याचार

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०५, नागपूर :** मागील वर्षभरापासून रेल्वेचे विकास कामे सुरू आहे. कंत्राटदाराकडून काही कामगार गेल्या आठ महिन्यांपासून अजनी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफार्म नंबर सात जवळ झोपडीत राहत आहेत. यातील पीडित तरुणी ही आई वडिलांसह राहते. तर आरोपी धीरज कुमार हा सुध्दा कामगार असून जवळपास राहत होता.

ते प्लॅटफार्मच्या बांधकामावर काम करीत होते. कामानिमित्त दररोज भेट व्हायची. यातूनच दोघांचीही मैत्री झाली आणि ते एकमेकांच्या प्रेमात पडले. आरोपी धीरज कुमारने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यांनी लग्नाच्या आणाभाका घेतल्या. धीरज कुमार संधी मिळताच अजनीच्या रेल्वे पुलाखाली तिच्यावर लैंगिक अत्याचार करायचा. मात्र, ईतवारी रेल्वे स्थानकावर विकास काम सुरू झाल्याने कामगारांना तेथे पाठविण्यात आले. त्याठिकाणी सुध्दा धीरज कुमार तरुणीवर लैंगिक अत्याचार करायचा. दरम्यान मुलीच्या शरीरातील बदल बघून आई वडिल तिला रूग्णालयात घेऊन गेले. ती पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तिच्या आई वडिलांनी विचारपूस केली असता धीरज कुमारचे नाव पुढे आले. त्यांनी आरोपीला बोलाविले. लग्न करण्यासाठी विनवणी केली. मात्र, लग्नाचे नाव ऐकताच तो पळाला. ‘तो मी नव्हेच’ अशी भूमिका घेत होता.

तरुणीच्या तक्रारीवरून लोहमार्ग पोलिसांनी आरोपी विरूध्द गुन्हा नोंदविला. पोलीस पथकाने त्याचे ‘लोकेशन’ काढले असता तो वरूडला असल्याचे समजले. पोलिसांनी वरूडहून त्याच्या मुसक्या आवळल्या. पोलिसांनी त्याला न्यायालयात



उपस्थित केले. ही कारवाई पोलीस निरीक्षक गावंडे यांच्या नेतृत्वात मजहर अली, पप्पू मिश्रा यांनी केली.

एका कामगार तरुणीला रेल्वेच्या पुलाखाली नेऊन युवकाने बलात्कार केला. ती पाच महिन्यांची गर्भवती झाल्यानंतर युवकाने तिला ओळखण्यास नकार दिला. ही गंभीर घटना अजनी रेल्वेस्थानक परिसरात उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविला आहे. धीरज कुमार (२२) रा. बिहार असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. गर्भवती असलेल्या पीडितेने त्याला लग्नासाठी विनवणी केली असता तो पळाला. मात्र, पोलिसांनी त्याला अमरावतीच्या वरूड येथून अटक केली.

**बिहारला पळून जाण्याची तयारी**

आरोपी धीरज कुमार याच्यावर प्रेयसी बलात्काराचा गुन्हा दाखल करणार असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे तो छट पूजेच्या नावाखाली नागपुरातून बिहारला पळून जाण्याच्या तयारीत होता. मात्र, त्यापूर्वीच त्याला पोलिसांनी अटक केली. त्याने छटपूजा झाल्यानंतर लग्न करणार असल्याचे पोलिसांना सांगितले. मात्र, तरुणीने गुन्हा दाखल करुन अटक करण्याची मागणी करीत त्याला धडा शिकवला. तरुणीच्या पोटात असलेल्या बाळाबाबत अद्याप निर्णय घेण्यात आला नसून प्रियकराच्या अटकेनंतर संभ्रम निर्माण झाला आहे.

## चिमुकल्याच्या मृत्यूप्रकरणी 3 डॉक्टरसह २ परिचारिकांवर गुन्हा

**दि.०५, पिंपरी :** पायाजवळ वॉर्मर मशीन ठेवल्याने गुडघ्याखालील पाय जळल्याने दोन वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू झाल्याप्रकरणी चिखलीतील एका खासगी रुग्णालयाच्या तीन डॉक्टरांसह दोन परिचारिकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ससून रुग्णालयातील समितीच्या अहवालात उपचारात हलगर्जीपणा झाल्याचे निष्पन्न झाल्याने दोषी डॉक्टर, परिचारीकांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. हा प्रकार मागीलवर्षी १८ नोव्हेंबर २०२३ रोजी घडला होता.

दिरांश रमाकांत गादेवार (वय २) असे मृत्यूमुखी पडलेल्या चिमुकल्याचे नाव आहे. त्याची आई दिपाली गादेवार (वय ३६, रा. नेवाळेवस्ती, चिखली) यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. डॉ. जितेश मदनसिंग दोभाळ, डॉ. रजनिश जगदंबाप्रसाद मिश्रा, डॉ. रोहन प्राणहंस माळी, परिचारिका रेचल अनिल दिवे, सविता नंदकिशोर वरवटे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दीपाली यांचा मुलगा दिरांश याला सर्दी झाल्याने त्यास डॉ. दोभाळ यांच्या सल्ल्यानुसार चिखलीतील नेवाळेवस्ती येथील इम्पिरीअल रुग्णालयात दाखल केले होते. त्याच्यावर उपचार सुरू असताना १८ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी सातच्या सुमारास डॉ. मिश्रा, डॉ. रोहन हे दिरांशचा नमुना (सॅम्पल) घेण्यासाठी आले. त्यांनी दिपाली यांना बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर सकाळी आठच्या सुमारास दिपाली या पुन्हा मुलाजवळ आल्यानंतर त्यांना धक्काच बसला. दिरांशच्या पायाजवळ ठेवलेल्या वार्मर मशीनमुळे त्याचा गुडघ्याखाली पाय पूर्णपणे जळाला. या घटनेत दिरांश याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# अक्षराज

२ बुलडाणा, बुधवार, दि.०६ नोव्हेंबर २०२४ विविधा


## संपादकीय



### किंग कोहली...

क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीचा आज ३६ वा वाढदिवस. किंग कोहलीला वाढदिवसाच्या सर्वप्रथम हार्दिक शुभेच्छा! क्रिकेट या खेळाने जगाला अनेक महान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०१३ साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्न संपूर्ण क्रिकेट विश्वाला पडला होता. ज्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नव्हते त्या प्रश्नाचे उत्तर खुद्द सचिनकडे होते. सचिनला जेंव्हा प्रश्न विचारण्यात आले की तुझा विश्वविक्रम कोणता खेळाडू मोडेल असे तुला वाटते तेंव्हा त्याने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले 'विराट कोहली' सर्वांना त्यावेळी ही अतिशोक्ती वाटली पण सचिनने विराटची गुणवत्ता हेरली होती. निवृत्त होण्यापूर्वी चार पाच वर्ष तो आणि विराट एकत्र खेळले होते त्यामुळे विराट कोणत्या क्षमतेचा खेळाडू आहे आणि तो काय करू शकतो हे सचिनला माहीत होते त्यामुळेच सचिनने आपला वारसदार म्हणून विराटची निवड केली होती. विराटने सचिनचे म्हणणे अवघ्या दहा वर्षात खरे करून दाखवले आणि सचिनचा विश्वास सार्थ ठरविला. आज विराट देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढत आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात आले आहेत. सचिनच्या एकदिवसीय शतकांचा विक्रम त्याने नुकताच मोडला असून त्याच्या नावावर आता ५० एकदिवसीय शतक आहेत. त्याने त्याच्या कारकीर्दीत एकूण ८० शतक झळकावले आहेत. एकदिवसीय क्रिकेट प्रमाणेच विराट सचिनच्या एकूण १०० शतकांचा विक्रमही लवकरच आपल्या नावे करेल यात शंका नाही कारण आज त्याच्या नावे ८० शतके आहेत. कसोटीत त्याने २९ शतके झळकावली आहेत तर एकदिवसीय सामन्यात ५० शतके त्याच्या नावावर आहेत. टी २० सामन्यातही त्याचे एक शतक आहे. आज तो ३६ वर्षाचा होत आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी तीन –चार – वर्ष सहज खेळू शकतो. त्यामुळे तो हा विक्रम सहज मोडेल. विशेष म्हणजे त्याच्या जवळपास जगातील दुसरा कोणताच खेळाडू नाही. विराट केवळ विक्रम वीर नाही तर तो आज जगातला महान फलंदाज बनला आहे. उत्तम खेळाडू ते महान खेळाडू बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अचंबित करणारा आहे. अवघ्या दहा बारा वर्षात तो आज जगातला महान खेळाडू बनला आहे. त्याने धावांची टांकसाळ उभारली आहे. प्रत्येक सामन्यात तो खोऱ्याने धावा काढत आहे. त्याची बॅट म्हणजे जणू धावांची मशिन, त्याच्या बॅट मधून धावांची बरसात होत आहे म्हणूनच आकाश चोप्रा त्याला विराट द रन मशिन कोहली असे म्हणतो. त्याने काढलेल्या शतकांपैकी ९५ टक्के शतके भारताच्या विजयास कारणीभूत ठरली आहेत यावरून त्याच्या शतकांचे मोल लक्षात येते. धावांचा पाठलाग करताना तर त्याने सर्वाधिक शतके झळकावली आहेत म्हणूनच त्याला चेस मास्टर असेही म्हंटले जाते. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. केवळ शतकच नव्हे तर त्याच्या अनेक छोट्या मोठ्या खेळी भारताला विजय मिळवून देणाऱ्या ठरल्या. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले आहेत. ऑस्ट्रेलियात झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धचा सामना आठवा. आपण तो सामना केवळ विराटमुळे जिंकू शकलो. हातातून गेलेला सामना त्याने ज्याप्रकारे खेचून आणला ते पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तशी खेळी फक्त आणि फक्त विराटच खेळू शकतो. मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने ७० धावा काढून भारताला विश्व विजयी केले होते. या दोन खेळी फक्त एक उदाहरण आहे. तशा प्रकारच्या अनेक खेळी करून त्याने भारताला अनेक अशक्यप्राय विजय मिळवून दिले आहेत. कठीण समय येता विराट कामी येई.... असे उगीच क्रिकेटप्रेमी म्हणत नाहीत. टी २० विश्वचषकात भारताला विजय मिळवून देऊन त्याने क्रिकेट प्रेमिंचे एक स्वप्न पूर्ण केले आहे आता यावर्षी होणाऱ्या विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत त्याने भारताला अजिंक्यपद मिळवून द्यावे अशी क्रिकेटप्रेमींची त्याच्याकडून अपेक्षा आहे. सध्या तो त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नाहीये मात्र तो असा खेळाडू आहे जो कधीही फॉर्मात येऊ शकतो. तो लवकरच त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये परतेल आणि भारताला कसोटी आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवून देईल यात शंका नाही.

विराटला पुन्हा एकदा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# औरंगजेबाच्या देहाची आणि कीर्तीची कबर खोदणारी महाराणी !


**राजाराम महाराजांच्या निधनानंतर राज्यकारभाराची सर्व सूत्रे हाती घेऊन महाराणी ताराबाईंनी मोगली फौजांना मागे सारण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी मराठेशाहीतील मुत्सद्यांना काळाचे गांभीर्य समजावून देऊन शेवटपर्यंत या सगळ्यांबरोबर एकजुटीने राहून शत्रू थोपवून धरला. त्या स्वतः लष्करापुढे येऊन लष्कराचा आत्मविश्वास वाढवित असत. मराठ्यांची खालावलेली आर्थिक परिस्थिती उंचावण्यासाठी त्यांनी मोगली मुलुखावर स्वाऱ्या करून चौथाई आणि सरदेशमुखी गोळा करून आर्थिक बळ वाढवले.**

महाराणी ताराबाई (१६७५ – १७६१) या छत्रपती राजाराम महाराजांच्या पत्नी आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या होत्या. ताराबाईंचे लग्न छत्रपती राजाराम महाराजांशी सन १६८७च्या सुमारास झाले. दि.२५ मार्च १६८९ रोजी मोगलांनी रायगडास वेढा घातला असता त्या छत्रपती राजाराम यांच्यासह रायगडावरून निसटून गेल्या. छत्रपती राजाराम जिंजीला गेल्यानंतर महाराणी ताराबाई, राजसबाई व अंबिकाबाई या विशाळगड येथे राहिल्या. रामचंद्रपंत अमात्य यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विशाळगड येथे लष्करी व मुलकी व्यवहाराची माहिती घेतली. सन १६९४ साली त्या तिघी जिंजीला पोहचल्या. दि.९ जून १६९६ रोजी महाराणी ताराबाईंना शिवाजी (दुसरा) हा पुत्र झाला.

ताराबाईंनी करवीर राज्याची म्हणजे कोल्हापूरच्या राजगादीची त्यांनी स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजीमहाराज यांच्यामागे त्यांनी समर्थपणे राज्याची धुरा सांभाळली. सरसेनापती संताजी, धनाजी यांना बरोबर घेऊन त्यांनी मोगलांना सळो की पळो करून सोडले. ताराबाई औरंगजेबाच्या प्रचंड मुघल सैन्याविरुद्ध उभ्या ठाकल्या असताना केवळ २४ ते २५ वर्षांच्या होत्या. त्यांनी औरंगजेबासारख्या मुत्सदी, नृशंस व कपटी सम्राटाशी सलग साडेसात वर्षे लढा दिला. तत्कालीन कवि गोविंद यांनी ताराबाईच्या शौर्याचे वर्णन असे केले आहे–

**दिल्ली झाली दीनवाणी। दिल्लीशाचे गेले पाणी।**
**ताराबाई रामराणी। भद्रकाली कोपली।।**
**ताराबाईच्या बखते। दिल्लीपतीची तखते।**
**खचो लागली तेवि मते। कुराणेही खंडली।।**
**रामराणी भद्रकाली। रणरंगी कृद्ध झाली।।**
**प्रलयाची वेळ आली। मुगलहो सांभाळा।।**

सन १७०० साली छत्रपती राजाराम म



हाराजांच्या मृत्यूनंतर मराठा साम्राज्याचे उत्तराधिकार छत्रपती शाहू महाराजांकडे वारसाहक्काने जाण्यास हवे होते. शाहूराजे त्यावेळी वयाने खूपच लहान होते आणि नंतरच्या काळात मोगलांच्या कैदेत होते. ताराबाईंनी आपला मुलगा शिवाजी ह्याला गादीवर बसवले आणि रामचंद्रपंत अमात्य यांच्या सल्ल्याने मराठा राज्याचा कारभार पाहण्यास सुरुवात केली. मोगलांनी औरंगजेबाच्या मृत्यूनंतर संभाजी राजांचे पुत्र शाहू यांची सुटका करताना महाराष्ट्रात दुहीचे बीज पेरले. शाहू हेच मराठा राज्याचे उत्तराधिकारी असल्याचे अनेक सरदार, सेनानी यांना वाटू लागले. दोन्ही बाजूंनी छत्रपतीपदाच्या वारसा हक्कावरून संघर्ष सुरू झाला. या काळात ताराबाईच्या पक्षातले खंडो बल्लाळ, बाळाजी विश्वनाथ, धनाजी जाधव यांसारखे सेनानी आणि मुत्सद्दी शाहूंच्या पक्षात गेले. शाहूराजांनी महाराणी ताराबाई आणि त्यांचा पुत्र शिवाजी दुसरा यांच्याविरुद्ध युद्ध पुकारले. सन १७०७ साली खेड येथे झालेल्या लढाईत बाळाजी विश्वनाथ ह्या पेशव्याच्या कुशल नेतृत्वाखाली शाहूराजांची सरशी झाली. ताराबाईंनी जिंकलेले सर्व किल्ले शाहूला मिळाले. शाहूच्या पक्षात गेलेले बाळाजी विश्वनाथ यांनी ताराराणीच्या पक्षातील उदाजी चव्हाण, चंद्रसेन जाधव, कान्होजी आंग्रे, पिलाजी गोळे आदी सेनानींना शाहूच्या बाजूला वळवून घेतले. त्यामुळे शाहूचा पक्ष बळकट झाला. शाहूंनी साताऱ्याला गादीची स्थापना केली आणि ताराबाईंनी साताऱ्याहून माघार घेऊन, कोल्हापूर येथे वेगळी गादी स्थापन केली. परंतु सन १७१४मध्ये राजारामची दुसरी विधवा पत्नी राजसाबाई यांनी ताराबाईस पदच्युत करून स्वतःचा मुलगा संभाजी (दुसरा) याला गादीवर बसवले. ताराबाई आणि तिच्या मुलाला दुसऱ्या संभाजीने कैद केले. शिवाजी (दुसरा) सन १७२६मध्ये मरण पावला. ताराबाईनंतर सन १७३०मध्ये छत्रपती शाहूंशी समेट करून कोणताही राजकीय अधिकार न ठेवता सातारा येथे राहावयाला गेल्या.

सन १७००साली जिंजी मोगलांच्या ताब्यात आली. पण तत्पूर्वी राजाराम जिंजीहून निसटून महाराष्ट्रात परतले. ताराबाई व इतर लोक मात्र मोगलांचा सेनापती जुल्फिखारखान यांच्या तावडीत सापडले. पण जुल्फिखारखानने सर्वांची मुक्तता केली. दि.३ मार्च १७००रोजी छत्रपती राजाराम यांचा सिंहगड किल्ल्यावर मृत्यू झाल्यानंतर मराठी साम्राज्याची सूत्रे ताराबाईंच्या हाती आली. त्यांच्या सैन्यामध्ये बाळाजी विश्वनाथ, उदाजी चव्हाण, चंद्रसेन जाधव, कान्होजी आंग्रे, पिलाजी गोळे, गिरजोजी यादव आदी मातबर सेनानी होते. त्यांनी मोगलांची पळता भुई थोडी अशी अवस्था केली. सन १७०५ साली त्यांनी मोगलांच्या ताब्यातील पन्हाळा किल्ला जिंकून कारंजा ही राजधानी बनविली. पुढे शाहूच्या मध्यस्थीने ताराबाईंची कैदेतून सुटका झाली. त्यानंतर त्या सातारा येथे राहावयास गेल्या. सन १७४०च्या दशकात शाहूच्या आयुष्याच्या शेवटच्या वर्षांत ताराबाईंनी त्यांच्याकडे एक मूल आणले, राजाराम दुसरा– ज्याला रामराजा देखील म्हटले जाते. तिने मुलाला आपला नातू आणि शिवाजी महाराजांचा थेट वंशज म्हणून सादर केले तिने असा दावा केला की त्याच्या संरक्षणासाठी तो जन्मल्यानंतर लपविला गेला होता आणि एका राजपूत सैनिकाच्या पत्नीने त्याला वाढवले

होते. ह्या मुलाला शाहूने दत्तक घेतले कारण त्याला स्वतःचा मुलगा नव्हता. सन १७४९मध्ये शाहूच्या मृत्यूनंतर राजाराम द्वितीय त्याच्यानंतर छत्रपती झाला. जेव्हा पेशवा बालाजी बाजीराव मुघल सरहद्दीवर रवाना झाला, तेव्हा ताराबाईंनी राजाराम द्वितीयला बालाजी बाजीराव यांना पेशव्याच्या पदावरून काढून टाकण्यास उद्युक्त केले. जेव्हा राजाराम यांनी नकार दिला, तेव्हा दि.२४ नोव्हेंबर १७५०रोजी तिने त्याला सातारा येथील अंधारकोठडीत कैद केले. तिने दावा केला की तो एक ढोंगी आहे आणि तिने शाहूसमोर राजाराम आपला नातू म्हणून खोटी साक्ष दिली होती. यापूर्वी ऑक्टोबर १७५०मध्ये ताराबाईंनी पेशवाविरोधी, उमाबाई दाभाडे यांची भेट घेतली होती. उमाबाईंनी ताराबाईंच्या समर्थनार्थ दामाजीराव गायकवाड यांच्या नेतृत्वात १५ हजार सैन्य पाठवले. गायकवाड यांनी साताऱ्याच्या उत्तरेस निंब येथे एका लहानशा गावात पेशवाईचा निष्ठावंत त्र्यंबकराव पुरंदरे यांच्या नेतृत्वात असलेल्या २० हजार बलाढ्य सैन्याचा पराभव केला. त्यानंतर त्यांनी साताऱ्याला कूच केले, जिथे त्यांचे ताराबाईंनी स्वागत केले. तथापि त्र्यंबकरावांनी पुन्हा आपले सैन्य स्थापन केले आणि १ मार्च रोजी वेण्णा नदीच्या काठावर असलेल्या गायकवाडच्या सैन्यावर हल्ला केला. या युद्धात गायकवाड यांचा पराभव झाला व त्याला मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागले. दरम्यान, पेशवे मोगल सीमेवरून परत आले आणि २४ एप्रिल रोजी सातारा येथे पोहोचले. त्यांनी ताराबाईंच्या सैन्यांचा पराभव करीत सातारा येथील यवतेश्वरच्या चौकीवर हल्ला केला. त्यांनी सातारा किल्ला घेरला आणि ताराबाईंना छत्रपती राजारामला सोडण्यास सांगितले. त्यावेळी राजारामाची शारीरिक व मानसिक स्थिती खूपच खालावली होती. ताराबाईंनी नकार दिला आणि पेशवे पुण्याला निघून गेले कारण सुसज्ज आणि मजबूत सातारा किल्ला घेण्यास सोपा होणार नव्हता. दरम्यान, पेशवाईच्या माणसांनी दामाजी गायकवाड, उमाबाई दाभाडे आणि त्यांच्या नातेवाईकांना अटक केली. त्याचवेळी सातारा सैन्याच्या तुकडीने तिच्याविरुद्ध बंड केले. तिने बंडखोरांचे नेते आनंदराव जाधव यांचा शिरच्छेद केला. तथापि, तिला समजले की ती पेशव्यांविरुद्ध लढू शकणार नाही आणि शांततेच्या करारासाठी पुण्यात भेटण्याची तयारी दर्शविली. पेशव्यांचा प्रतिस्पर्धी जानोजी भोसले हा पुष्कळ सैन्य घेऊन पुण्याजवळ होता आणि त्यामुळे पेशव्यानी तिचे संरक्षण करण्याचे मान्य केले. पुण्यात पेशवे तिच्याशी आदराने वागले आणि काही नाखुषीनंतर ताराबाईंनी पेशव्याचे श्रेष्ठत्व स्वीकारले. पेशवे यांना नापसंत करणारे सरदार जाधव यांना काढून टाकण्याचे तिने मान्य केले. त्या बदल्यात पेशवाईने तिला माफ केले. दि.१ सप्टेंबर १५५२ रोजी दोघांनी परस्पर शांततेचे वचन देऊन जेजुरीतील खंडोबा मंदिरात शपथ घेतली. या शपथविधीत ताराबाईंनीही शपथ घेतली की राजाराम दुसरा तिचा नातू नाही. तथापि, पेशव्यांनी राजारामला एक शक्तीहीन छत्रपती म्हणून कायम ठेवले.

राजारामांनतर मराठी राज्याला नेतृत्व नसताना, ताराबाई यांनी मराठी राज्य टिकवूना ठेवले. मराठी राज्य जिंकण्यासाठी आलेल्या औरंगजेबाच्या देहाची आणि कीर्तीची कबर महाराष्ट्राच्या भूमीतच खोदली गेली. राज्याला, गादीला आणि समाजाला खंबीर नेतृत्व दिले, सर्वांचे नीतिधैर्य टिकवून ठेवले. वयाच्या ८६व्या वर्षी ताराबाईंचे सिंहगडावर दि.६ नोव्हेंबर १७६१ रोजी निधन झाले. मराठ्यांच्या इतिहासात महाराणी ताराबाई हे एक ज्वलंत पर्व आहे. या काळात तिने मुघल सत्तेच्या विरुद्ध लढे देऊन मराठी राज्याला नेतृत्व बहाल करण्याचे काम केले व आपले कार्य आणि कर्तृत्व निर्विवादपणे सिद्ध केले.

**!! स्मृतिदिनी महाराणी ताराबाई भोसले यांना विनम्र अभिवादन !!**

**– संकलन –**

**श्री.कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**गडचिरोली, ९४२३७१४८८३**

## खेळी...

राजपुत्रा जिंकू आणू
वरिष्ठांची नवी खेळी
ताटकळले रांगे मध्ये
निष्ठवंतांचे जाई बळी

दूर सारावे प्रतिस्पर्धी
धमकी वेळी अवेळी
मान्य करुनि घ्यायचे
रोखून बंदुकीचीनळी

आयुष्य होई वाळवंट
उठत राहते वावटळी
परिसरात काहीहोवो
मुलेआपले कवटाळी

सगे सोयरे साथ करे
सहन करत अनर्गळी
प्रवक्ते चालवे टकळी
बडबड व्यर्थ चावळी

परिवारात सत्ता फिरे
फुलत राही वंशावळी
नेतापुत्राच्या सोहळ्या
घाली मी जेवणावळी

नवस बोले जयासाठी
गर्दी भक्ताची राऊळी
उपवास करे कार्यकर्ते
चर्च मशिदी न् देवळी

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**


अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी


# शहरे गुदमरली ; श्वास कोंडला...

सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही दिवाळीच्या दिवसात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या फटाकेबाजीमुळे देशातील प्रमुख शहरांत रात्रीच्या वेळेत हवा प्रदूषणात प्रचंड वाढ झाल्याचे समोर आले आहे.

शुक्रवार, शनिवार आणि रविवार या तिन्ही दिवशी दिल्लीसह देशातील प्रमुख शहरांच्या हवेचा निर्देशांक वाईट स्तरावर होता त्यामुळे आधीच प्रदूषित असलेली शहरांची हवा आणखी प्रदूषित झाली. वास्तविक फटाकेमुक्त, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा असे आव्हान अनेक सामाजिक आणि सेवाभावी संस्थांनी केले होते. शालेय शिक्षण विभागाने तर शालेय विद्यार्थ्यांना फटाके उडवणार नाही अशी शपथ दिली होती. न्यायालयाने फटाके उडविण्यास परवानगी दिली मात्र वेळेचे बंधन घातले या सगळ्या आव्हानांकडे नागरिकांनी दुर्लक्ष करत मनसोक्त फटाकेबाजी केली. वास्तविक फटाक्यांचे दुष्परिणाम सर्वांना माहीत आहे तरीही दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सरकारच्या आणि सेवाभावी संस्थांच्या आव्हानाला हरताळ फासत सर्वत्र फटाक्यांचा बेसुमार धूर काढण्यात आला त्याचा व्हायचा तो परिणाम झालाच.

फटाक्यांमुळे अनेक शहरांची हवा प्रदूषित झाली विशेषतः दिल्ली, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या मोठ्या शहरातील हवेचे प्रदूषण चिंता वाटावी इतक्या गंभीर पातळीवर जाऊ लागले. जी शहरे कमी प्रदूषित शहर म्हणून गणली जात होती त्या शहरातही हवेचे प्रदूषण कमालीचे वाढल्याचे एका अहवालातून समोर आले आहे. मुंबई, पुण्याच्या तुलनेत ग्रामीण भागात कमी प्रदूषण असते मात्र यावेळी ग्रामीण भागातही प्रदूषण कमालीचे वाढले. ग्रामीण भागात पहिल्यांदाच इतके प्रदूषण दिसून आले. याला फटाकेच जबाबदार आहेत. दिवाळीत बेसुमार फटाकेबाजी करण्यात आली त्यामुळे चांगली हवा असलेले शहर अशी ओळख असलेल्या शहरांचीही प्रदूषित शहरात गणना झाली आहे.

अर्थात मुंबई, नवी मुंबई हेच शहरे नाही तर पुणे, नागपूर, औरंगाबाद यासारख्या शहरातही फटाक्यांच्या आतषबाजीने प्रदूषण वाढले आहे. केवळ राज्यातीलच नाही तर देशातीलही अनेक शहरात फटाक्यांमुळे प्रदूषण वाढले आहे. देशातीलच नव्हे तर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिल्ली शहरातील हवा या वर्षीही अती प्रदूषित श्रेणीत गणली गेली आहे. आपल्या राज्यासह देशात उत्सवाच्या नावाखाली लोकांनी मनमानी करत बेसुमार फटाक्यांची आतषबाजी केली त्यामुळेच दरवर्षीपेक्षा यावर्षी अधिक प्रमाणात फटाके उडवण्यात आले त्याच्याच परिणाम म्हणजे राज्यातील अनेक शहरे अतिप्रदुषित किंवा प्रदूषित श्रेणीत गणली गेली. सर्वोच्च न्यायालयाने ही यावर नाराजी व्यक्त करत दिल्ली व केंद्र सरकारला फटकारले आहे. अर्थात हवा प्रदूषित होण्यास केवळ फटाके हेच एकमेव कारण आहे असे नाही तर वाढती वाहने हे ही एक महत्वाचे कारण यामागे आहे मात्र दिवाळीत प्रदूषणाची पातळी खूप वाढते हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही आता हेच पहाणा गुरुवारी संध्याकाळी पुण्या – मुंबईच्या हवेची पातळी समाधानकारक या श्रेणीत होती ती अवघ्या चोवीस तासात वाईट या श्रेणीत पोहचली याचाच अर्थ बेसुमार फटाकेबाजीने हवा प्रदूषित झाली. हवा प्रदूषित झाल्याने शहरांचा जीव गुदमरला आणि नागरिकांचा श्वास कोंडला. दिवाळी नंतर अस्थमाच्या रुग्णांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. या दूषित हवेचा सर्वाधिक फटका लहानमुले, गरोदर महिला, वृद्ध नागरिक व व्याधीग्रस्त रुग्णांना बसला शिवाय फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी दुर्घटना घडल्याच्या बातम्याही आपण टीव्हीवर पाहिल्या.

अनेक मुले फटाक्यांमुळे जखमी झाले तर काही ठिकाणी फटाक्यांमुळे आग लागून दुर्घटना घडल्या त्यात मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. हे सर्व टाळायचे असेल तर किमान पुढील वर्षांपासून तरी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करायला हवी. सरकारनेही फटाक्यांवर बंदी आणायला हवी आणि हो ही बंदी केवळ दिवाळी पुरतीच नको तर कायमस्वरूपी हवी कारण दिवाळी व्यतिरिक्त इतरवेळीही फटाके वाजवले जातात. दिवाळीत त्याचे प्रमाण अधिक असते इतकेच कदाचीत त्यामुळेच दिवाळीत फटाक्यांचे दुष्परिणाम तीव्रतेने दिसून येतात.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# मतदान केंद्रांवर आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करवाव्यात : अशोक शिनगारे



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, ठाणे :** २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रावर मतदारांसाठी करण्यात आलेल्या सोयीसुविधांचा आढावा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी आज घेतला. सदर बैठकीत उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, महापालिकांचे नगर अभियंता, तसेच ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रावर सोयीसुविधांसाठी कार्यरत असलेले अभियंते उपस्थित होते.

ठाणे महानगरपालिका हद्दीत १ हजार ५४६ मतदान केंद्रे, कल्याण डोंबिवली महानगर पालिका हद्दीत १ हजार २६१ मतदान केंद्रे, ग्रामीण भागात १ हजार १२४ मतदान केंद्रे, नवी मुंबई महापालिका हद्दीत ८३१ मतदान केंद्रे, मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ७५५ मतदान केंद्रे, भिवंडी महानगरपालिका हद्दीत ५८६ मतदान केंद्रे, उल्हासनगर महानगरपालिका ३९९ मतदान केंद्रे, तर सर्व नगरपालिका हद्दीत ४५३ मतदान केंद्रे आहेत.

या सर्व मतदान केंद्रावर पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची जबाबदारी ही त्या त्या महानगरपालिका, नगरपालिका यांची असून ग्रामीण भागातील मतदान केंद्राची जबाबदारी ही जिल्हा परिषदेकडे आहे.

ठाणे जिल्हयातील १८ विधानसभा मतदार संघातील सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी सूचना फलक, दिशादर्शक, दिव्यांगांसाठी रॅम्पची सुविधा, मतदार सहाय्य केंद्र, पुरेशी व्यवस्था, मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छ स्वच्छतागृहे, प्रतिक्षालय, रांगेतील मतदारांसाठी खुर्च्यांची व्यवस्था तसेच मंडपात असलेल्या मतदान केंद्रानजीक मोबाईल टॉयलेटची व्यवस्था, प्रथमोपचार सुविधा, मतदान केंद्रावर पाळणाघर, तसेच दिव्यांगासाठी व्हीलचेअरची सुविधा, पार्टीशन मध्ये तयार करण्यात आलेल्या मतदान केंद्रावर लावण्यात येणाऱ्या रांगांसाठी जागेची उपलब्धता आदी सर्व सुविधा देण्याच्या दृष्टीने प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नियोजन करावयाचे आहे. तसेच मतदान केंद्रावर आदल्या दिवशी पासून जाणाऱ्या मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना लागणारी आवश्यक साधनसामुग्री देखील उपलब्ध करुन देण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या.

# राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे महायुतीला लागलेला कॅन्सर : आ. महेंद्र थोरवे



**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.०५, कर्जत :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष तथा रायगड-रत्नागिरी लोकसभेचे खासदार सुनील तटकरे हे महायुतीला लागलेला कॅन्सर आहे, तो वेळीच काढला पाहिजे अशी खरमरीत टीका कर्जत-खालापूर विधानसभेचे महायुतीचे उमेदवार आ. महेंद्र थोरवे यांनी कर्जत येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.

आ. महेंद्र थोरवे यांनी आज प्रचाराचा शुभारंभ करण्यापूर्वी पोसरी येथे पत्रकार परिषद घेतली. यावेळी उमेदवार महेंद्र थोरवे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर घणाघाती आरोप करीत हिंम्मत असेल तर कर्जत-खालापूर विधानसभा मतदार संघात उघड प्रचार करावा, असे आव्हान दिले.

आ. थोरवे पुढे म्हणाले की, कर्जत-खालापूर विधानसभेमधील अपक्ष उमेदवार सुधाकर परशुराम घारे हे सुनील तटकरे यांचे पिल्लू असून पाप सुध्दा आहे. महायुतीचा धर्म इतर घटक पक्ष पाळत असताना तटकरे पाळत नाहीत, असा गंभीर आरोप करीत महाडमधील महायुतीचे उमेदवार भरत गोगावले, अलिबागचे महेंद्र दळवी आणि नासिकमधील उमेदवार सुहास कांदे यांच्याबाबतीत तटकरे कारस्थाने करीत असल्याचा आरोप थोरवे यांनी केला आहे. भ्रष्टाचार कसा करायचा हे तटकरे यांना चांगले माहिती आहे. माझ्या विकासकामांत तटकरे कसा खोडा घालतात याचा पाढाच त्यांनी पत्रकार परिषदेत वाचला. तटकरे यांना महायुतीतून हाकलून द्यावे असेही त्यांनी निक्षून सांगितले. अशा आत्मघातकी नेतृत्वाचा निषेध करीत असून त्यांच्यात गद्दारीचा डीएनए असल्याचा आरोपही महेंद्र थोरवे यांनी केला.

महायुतीतील एका उमेदवाराने इतक्या गंभीर स्वरूपाचे आरोप आणि सडकून टीका प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर केल्याने महायुतीत याचे काही पडसाद उमटणार का हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

# नवी मुंबईतून संभाजी ब्रिगेड लढण्याचे निश्चित !





**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, कोपरखैरणे (नवी मुंबई) :** महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ मध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने, संभाजी ब्रिगेडला महाराष्ट्रात एकही सीट न दिल्यामुळे अपमानित झालेल्या संभाजी ब्रिगेडने महाराष्ट्रात स्वतंत्रपणे आपले उमेदवार उभे करावेत अशी कार्यकर्त्यांची मागणी होत होती. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य अध्यक्ष ॲड. मनोज आखरे व राज्य महासचिव सौरभ खेडेकर, यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांची मीटिंग घेऊन महाराष्ट्रात आपले उमेदवार उभे करण्याचे निश्चित केले, व आपल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना तसे आदेश दिले.

त्या अनुषंगाने संभाजी ब्रिगेड नवी मुंबई संपर्क प्रमुख संदीप बारड यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष मारुती खुटवड आणि महानगर अध्यक्ष कुणाल लवांडे यांच्या अध्यक्षतेखाली नवी मुंबई येथील १५० ऐरोली विधानसभा व १५१ बेलापूर विधानसभा निवडणूक लढण्याचे निश्चित केले गेले. त्यानुसार नवी मुंबई मधील १५० ऐरोली या विधानसभेतून डॉ. शरद दगडू देशमुख, आणि १५१ बेलापूर विधानसभेतून डॉ. अजय बाबुराम गुप्ता यांनी आपले उमेदवारी अर्ज निवडणूक आयुक्तांकडे सादर केले. निवडणूक आयोगाद्वारे त्यांचे अर्ज वैध ठरले असून त्यांना उमेदवार म्हणून लढण्याची परवानगी मिळालेली आहे. ४ नोव्हेंबर ही अर्ज मागे घेण्याची तारीख ओलांडली असून यातल्या कोणीही आपले अर्ज मागे घेतलेले नाहीत. त्यामुळे १५० ऐरोली विधानसभा येथून डॉ. शरद दगडू देशमुख आणि १५१ बेलापूर विधानसभा येथून डॉ. अजय बाबुराम गुप्ता यांची उमेदवारी निश्चित झाली आहे. असे संभाजी ब्रिगेड नवी मुंबई उपाध्यक्ष सुनीता संकपाळ यांनी कळविले आहे.

तसेच डॉ. शरद देशमुख आणि डॉ. अजय गुप्ता यांना शिलाई मशीन हे चिन्ह मिळाल्याचे संभाजी ब्रिगेड नवी मुंबई अध्यक्ष मारुती खुटवड यांनी अधिकृतपणे पत्र देऊन कळविले आहे.

# महायुतीचे उमेदवार काशिनाथ दातेंचा आज प्रचार शुभारंभ...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** बुधवार, दिनांक ०६ नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भारतीय जनता पार्टी, शिवसेना, आरपीआय यांसह महायुतीमध्ये समाविष्ट इतर घटक पक्षांचे अधिकृत उमेदवार काशिनाथ दाते सरांचा निवडणूक प्रचाराचा शुभारंभ दैठणे गुंजाळ येथील श्री खंडेश्वर मंदिरात नारळ वाढवून संपन्न होणार असल्याकारणाने सबंधित सोहळ्यास उपस्थित राहण्यासंबंधी पारनेर-नगर महायुतीच्या वतीने मतदारसंघातील जनतेला आवाहन केले आहे. यावेळी करण्यात आलेल्या आवाहनात २२४ पारनेर-नगर मतदारसंघातील महायुतीच्या घटकपक्षांचे सर्व पदाधिकारी, इतर पक्षीय सहकारी मित्र व मतदार बंधू-भगिनींना नम्रपणे निमंत्रित करण्यात येते की, आज बुधवार दि.६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९:३० वा. महायुतीचे अधिकृत उमेदवार काशिनाथ दाते यांच्या विधानसभा निवडणूक प्रचाराचा शुभारंभ दैठणे गुंजाळ येथे खंडेश्वर चरणी श्रीफळ वाढवून अखिल भारतीय जनता पक्षाचे महामंत्री तथा उत्तर प्रदेशचे राज्यसभा खासदार अनिल जैन व माजी मंत्री तथा राहुरी-नगर मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार शिवाजीराव कर्डिले या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित सबंधित सोहळा संपन्न होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. सबंधित सोहळ्यासाठी मतदारसंघातीलही विविध मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले असून त्यामध्ये पारनेर तालुक्याचे ज्येष्ठ नेते व अहमदनगर जिल्हा मराठा संस्थेचे विश्वस्त सिताराम (आण्णा) खिलारी, खरेदी विक्री संघाचे व्हा.चेअरमन गंगाधर रोहकले, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीपजी भालसिंग, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष बाबुशेठ टायरवाले, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित पाटील झावरे, राष्ट्रवादीचे माजी जिल्हाध्यक्ष प्रशांत गायकवाड, भाजपा तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, माजी सभापती गणेश शेळके, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बाबाशेठ खिलारी, नगर तालुका भाजपा तालुकाध्यक्ष दिपकजी कार्ले, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष वसंत चेडे, भाजपचे जिल्हाउपाध्यक्ष सुभाष दुधाडे, माजी तालुकाध्यक्ष सुनिल थोरात, संदीप पाटील वराळ जनसेवा फौन्डेशनचे अध्यक्ष सचिन पाटील वराळ, शिवसेना युवकचे तालुकाध्यक्ष सुभाष सासवडे, भाजपचे युवक अध्यक्ष पंकज कारखिले, शिवसेना जिल्हाध्यक्ष देवेंद्र गावडे, भाजपा युवा मोर्चा कार्यकारिणी सदस्य अमित गावडे, भाजपा युवासेना उपाध्यक्ष शरद गवते, भाजपा महिला जिल्हाध्यक्षा अश्विनीताई थोरात, भाजपा तालुकाध्यक्षा सोनालीताई सालके, राष्ट्रवादीच्या महिलाध्यक्षा सुषमाताई रावडे, खरेदी विक्री संघाचे सर्व सन्मा. संचालक मंडळ, विविध गावच्या स्थानिक सेवा संस्थांचे पदाधिकारी आदी मान्यवरांचा समावेश असल्याचेही सांगण्यात आले आहे.

## शिवसेनेचे बंडखोर उमेदवार प्रा. शशिकांत गाडे यांचा कळमकर यांना पाठिंबा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहर विधानसभा निवडणुकीत काल घडलेल्या अर्ज माघारीच्या नाट्यमय घडामोडीनंतर मंगळवार, दिनांक ०५ नोव्हेंबर रोजी पुन्हा राजकीय ट्विस्ट पाहयला मिळाला. महाआघाडीतुन बंडखोरी केलेले शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे यांनी महाआघाडीचे अधिकृत उमेदवार अभिषेक कळमकर यांना पाठिंबा जाहिर केला. यावेळी खा. निलेश लंके, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, माजी महापौर भगवान फुलसौंदर, शहरप्रमुख संभाजी कदम, विक्रम राठोड, कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे उपस्थीत होते.

यावेळी प्रा. गाडे म्हणाले की, माघारीचा अर्ज चुकुन कार्यकर्त्यांच्या हातात राहिला. दुसरा अर्ज लिही पर्यत वेळ संपली. मात्र आता अभिषेक कळमकर यांना पाठिंबा देत असुन स्वतः उमेदवार समजुन सर्व शिवसैनिकांनी प्रयत्न करावेत. खा. निलेश लंके यांनी महाआघाडीची एकजुट ठेऊन नगर शहर दहशत मुक्त करण्यासाठी सर्वांनी कामाला लागण्याची विनंती केली. यावेळी बाळासाहेब बोराटे, योगिराज गाडे उपस्थीत होते.

# थोडक्यात

## धानिवरी येथे कणसरी ग्रुप आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील धानिवरी येथे कणसरी ग्रुप आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाचे दरवर्षी करण्यात येते, या वर्षी ही सोमवारी संध्याकाळी हा कार्यक्रम मोठ्या उत्सहात संपन्न झाला. हा कार्यक्रम पालघर जिल्ह्यातील नवोदित कलाकारांसाठी एक व्यासपीठ आहे. या कार्यक्रमाला पालघर जिल्ह्यातील असंख्य युट्युब कलाकार यांनी हजेरी लावली होती. या वर्षी कणसरी ग्रुप च्या माध्यमातून खुल्या डान्स स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या, उत्कृष्ट डान्स करणाऱ्या स्पर्धकांना रोख पारितोषिक व चषक देऊन सन्मान करण्यात आला.

यावर्षी या कार्यक्रमाला पालघर जिल्ह्यातील राजकीय लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवलेली होती. सद्या विधानसभा निवडणुका ह्या अंतिम टप्प्यात आल्या असून निवडणुक प्रचाराने जोर धरला आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष आपला प्रचार करण्यासाठी एखाद्या नियोजित कार्यक्रमासाठी खास हजेरी लावून आपली संधी साधून घेत असतात. धानिवरी येथे ही कणसरी ग्रुप च्या संस्कृतीक कार्यक्रमाला पालघर विधानसभेचे चार उमेदवार एकाच व्यासपीठावरती पाहायला मिळाले यामध्ये महायुती चे राजेंद्र गावित, महाविकास आघाडी चे जयेंद्र दुबळा, मनसे चे नरेश कोरडा तर युवा एल्गार आघाडी चे अपक्ष उमेदवार अँड. विराज गडग यावेळी उपस्थित होते. त्यामुळे निवडणुकीच्या रणांगणात जरी स्वातंत्र्य लढत असली तरी मात्र या कार्यक्रमाच्या निमित्त त्यांची चांगली जुगलबंदी पाहायला मिळाली. तर बोलायची संधी मिळाल्यावर ही त्यांनी जनतेला शुभेच्छा ही दिल्या मात्र, असं असल तरी या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रत्येक राजकीय राजकीय पक्षातील उमेदवार अशा कार्यक्रमाला उपस्थित राहून आपले राजकीय पोळी भाजण्याचे विशेष काम करत असतो . गेल्या अनेक वर्ष कणसरी ग्रुप चे आयोजक संजू बोबा हे कार्यक्रमाचे आयोजन करत असतात. या कार्यक्रमासाठी पालघर जिल्ह्यातील अनेक कलावंत आपली उपस्थिती दर्शवत आपली कला सादर करत असतात. या कार्यक्रमाला पालघर जिल्ह्यातील अनेक रसिक प्रेमी उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाचा आस्वाद घेत असतात.

## नागरिकांच्या सहभागातून आधारकार्ड सेंटर येथे मतदान जनजागृती अभियान




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, ठाणे :** ठाणे शहरातील उद्योजक, कंपन्या, कारखाने, शासनाचे शासकीय, निमशासकीय कार्यालयातील मतदार, नवमतदारांमध्ये मतदानाच्या हक्काबाबत मोठ्या प्रमाणात जागृती करावी. अशा सूचना १४८ ठाणे विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील यांनी दिल्या आहेत. त्यांच्या सूचनेनुसार ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथील आधारकार्ड केंद्र येथील कार्यरत कर्मचारी व आधारकार्ड नोंदणी करण्यासाठी आलेल्या नागरिकांसोबत मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

प्रत्येक मत अमूल्य आहे. कोणीही मतदानापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता येथे उपस्थित असलेल्या कर्मचारी व नागरिकांनी घेणे आवश्यक आहे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आधारकार्ड सेंटर मध्ये नोंदणी करण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला दि.२० नोव्हेंबर २०२४ ही मतदानाची तारीख सांगून त्यांना मतदान करण्यास प्रोत्साहन द्यावे आणि सर्वांनी न चुकता २० नोव्हेंबर २०२४ रोजी अवश्य मतदान करावे, असे आवाहन उपस्थितांना करण्यात आले.

कार्यक्रम स्थळी मतदान जनजागृती अभियान संबंधित घोषवाक्याद्वारे घोषणा देण्यात आल्या व मतदारांसाठी प्रतिज्ञाचे सामूहिक वाचन घेण्यात आले.

## आचारसंहिता भंगाच्या २४५२ तक्रारी निकाली




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, मुंबई :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण २४६९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी २४५२ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी-व्हिजिल ॲप हे कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या ॲपद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

२५३ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त

राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण २५३ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.